**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना संबोधित करणार

- अमेरिकनं लादलेल्या अतिरिक्त आयात शुल्काचा मर्यादित परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल असा विश्वास मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्याकडून व्यक्त

- भारत-सिंगापूरदरम्यान नवी दिल्लीत मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेत चर्चा

- वसई विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिल पवार यांना ईडीकडून अटक

**आणि**

- भारतीय पुरुष फुटबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी माजी आंतराष्ट्रीय फुटबॉलपटू खालिद जमील यांची नियुक्ती

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना संबोधित करणार आहेत. हे संबोधन संध्याकाळी सात वाजल्यापासून आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित केलं जाईल. त्यानंतर या संबोधनाचं इंग्लिश भाषांतर प्रसारित होईल. तर या संबोधनाचं स्थानिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता प्रसारित होणार आहे. यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र उद्या संध्याकाळी पावणेसात वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

अमेरिकनं लादलेल्या अतिरिक्त आयात शुल्काचा **मर्यादित** परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल, तीन ते सहा महिन्यानंतर हे नुकसान भरून काढू असा विश्वास मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी आज व्यक्त केला.

दागदागिने, कोळंबी आणि वस्त्रोद्योग क्षेत्राला सध्या या आयात शुल्काचा मोठा फटका बसतो आहे. पण सरकारला या नुकसानीची जाणीव आहे आणि या क्षेत्रातल्या उद्योगांशी सरकारनं चर्चा सुरू केली आहे, असं त्यांनी नमूद केलं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात शुक्रवारी होणाऱ्या चर्चेचा परिणामही भारत आणि अमेरिका व्यापारावर होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

भारत-सिंगापूर मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेचा तिसरा टप्पा आज नवी दिल्लीत पार पडला. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल तर सिंगापूरचे उपप्रधानमंत्री गॅन किम योंग आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री जोसेफिन तेओ या परिषदेला उपस्थित होते. भारत-सिंगापूर व्यापक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल डॉ. जयशंकर यांनी त्यांचे आभार मानले. भारत-सिंगापूर संबंध दृढ करण्यासाठी सरकार आणि उद्योग यांच्यातला समन्वय महत्त्वाचा असल्याचं मत जयशंकर यांनी मांडलं. त्यानंतर सिंगापूरच्या प्रतिनिधीमंडळानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतली.

<><><><><>

स्वातंत्र्यदिन अवघ्या दोन दिवसांवर आला असून देशात आणि देशाबाहेरही त्याची जय्यत तयारी सुरू आहे. विविध ठिकाणी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीनं दिल्ली पोलिसांनी सुरक्षाव्यवस्था कडक केली आहे. या सोहळ्याला जाणाऱ्यांच्या सोयीसाठी दिल्ली मेट्रोची सेवा पहाटे चार वाजल्यापासून सुरू होणार आहे. स्वातंत्र्यदिनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ऐतिहासिक लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करतील आणि त्यानंतर किल्ल्याच्या तटावरून देशाला संबोधित करतील.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जम्मू भागात, विशेषतः पाकिस्तानच्या सीमावर्ती प्रदेशात सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली आहे.

७९व्या स्वातंत्र्यदिनाच्या संचलनाची तयारीही सर्वत्र सुरू आहे. श्रीनगर आणि जम्मूमध्ये, तसंच पुदुचेरीच्या बीच रोडवर या संचलनाची रंगीत तालीम आज घेण्यात आली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रानं श्रीलंकेत कोलंबो इथं सांगीतिक कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत आजपासून पुढचे तीन दिवस आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या निवासस्थानी तिरंगा फडकावून या अभियानात भाग घेतला. हे अभियान आता लोकचळवळ बनली असून, ज्यामुळे देशात एकतेचा संदेश प्रसारित होत असल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं. या अभियानांतर्गत अनेक केंद्रीय मंत्री आणि राजकीय नेत्यांनी आपापल्या निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवला. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी, क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनीही आपल्या निवासस्थानी तिरंगा फडकवून स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहिली.

जम्मूच्या सर्व १० जिल्ह्यांमध्ये हर घर तिरंगा अभियानासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. लडाखच्या कारगिलमध्येही आज तिरंगा रॅली काढण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीनं नागालँड इथं आज हर घर तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. ललित कला केंद्राच्या ईशान्य स्थानिक केंद्रातर्फे मिरवणूक काढण्यात आली. त्रिपुरा आणि ईशान्य भारतातल्या स्वातंत्र्यसेनानींचे पुतळे हे या मिरवणुकीचं आकर्षण ठरलं.

**<><><><><>**

वसई विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिल पवार यांना ईडीनं आज अटक केली. त्यांच्यासह शहराचे माजी नगर नियोजक वाय. एस. रेड्डी आणि इतर दोघांनाही ईडीनं अटक केली. काही दिवसांपूर्वी ईडीनं या सर्वांवर धाड टाकली होती आणि त्यांची चौकशी केली होती. अवैध बांधकामांना परवानगी देण्यासाठी पैसे घेतल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

<><><><><>

राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात आज झालेल्या अपघातात १० जण ठार झाले, तर इतर ११ जण जखमी झाले. दौसा-मनोहरपूर महामार्गावर एक पिकअप आणि मेट्रो एकमेकांवर धडकले. या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या ८ जणांवर जयपूरमध्ये, तर इतरांवर दौसा इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त करून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली.

<><><><><>

झारखंड इथे पश्चिम सिंहभूम जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत छत्तीसगडमधला सीपीआय माओवादी पक्षाचा कमांडर निलेश मकदम उर्फ वरूण ठार झाला आहे. सुरक्षा दल आणि जिल्हा पोलीस अजूनही या परिसरात शोध मोहीम राबवत असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र साठा जप्त करण्यात आला आहे.

<><><><><>

भारतीय पुरुष फुटबॉल संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी माजी आंतराष्ट्रीय फुटबॉलपटू खालिद जमील यांची नियुक्ती झाली आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने ही नियुक्ती जाहीर केली असून खालिद जमाल यांचा कार्यकाळ २ वर्षांचा

असेल. जमील यांनी जमशेदपूर, नॉर्थ-ईस्ट युनायटेड, ईस्ट बंगाल, मोहन बगान आणि मुंबई अशा विविध फुटबॉल क्लब्समधे काम केलं आहे.

<><><><><>

२०३०मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धांचं आयोजन करण्यासाठी भारताकडून अधिकृत प्रस्ताव सादर करायला भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं मंजुरी दिली आहे. अमदाबाद, दिल्ली किंवा भुवनेश्वरमध्ये या स्पर्धांच्या आयोजनासाठी पुरेशा सुविधा असल्याचं संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यासंदर्भात झालेल्या बैठकीनंतर म्हणाल्या. ३१ ऑगस्टपूर्वी हा प्रस्ताव आयोजकांकडे पाठवला जाईल. त्यावर नोव्हेंबरमध्ये अंतिम निर्णय होईल.

<><><><><>

दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येत लक्ष घालू, असं आश्वासन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज दिलं. या भागातली सर्व भटकी कुत्री पकडून त्यांना निवारा केंद्रांमध्ये हलवण्याचे आदेश न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांनी सोमवारी या क्षेत्रातल्या महानगरपालिकांना दिले होते. दिल्लीत कुत्र्यांचं लसीकरण आणि नसबंदी आणि २०२४मध्ये सर्वोच्च न्यायालयानं यासंदर्भात दिलेल्या निकालाचा उल्लेख एका वकिलांनी आज न्यायालयासमोर केला.

<><><><><>

केंद्रीय युवक व्यवहार मंत्रालयाच्या माय भारत उपक्रमानं स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिप फाऊंडेशन सोबत सामंजस्य करार केला आहे. ज्ञानाची देवाणघेवाण, क्षमता विकास आणि युवकांमध्ये नेतृत्त्व विकासासाठी या माध्यमातून काम केलं जाणार आहे. देशभरातल्या १८ ते २९ वयोगटातल्या १ लाख युवकांना या अंतर्गत प्रशासन, सार्वजनिक धोरण, सामाजिक नवोद्योग, डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता आणि इतर क्षेत्रातलं प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या राष्ट्रपती भवन इथं अमृत उद्यानाच्या उन्हाळी वार्षिक महोत्सवाचं उद्घाटन करतील. अमृत उद्यान शनिवारपासून १४ सप्टेंबरपर्यंत सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळेत जनतेसाठी खुलं असेल. २९ ऑगस्टला म्हणजेच राष्ट्रीय क्रीडा दिनी खेळाडूंना आणि ५ सप्टेंबरला शिक्षकांना अमृत उद्यानात विशेष प्रवेश दिला जाणार आहे.

**<><><><><>**

निवृत्तीवेतन धारकांच्या हयातीच्या दाखल्यांसाठी चौथी देशव्यापी डिजिटल मोहीम यंदा नोव्हेंबर महिन्यात आयोजित केली जाणार आहे. फेस ऑथेंटिकेशन म्हणजे चेहऱ्यावरुन ओळख पटवण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करून निवृत्तीवेतनधारकांच्या डिजिटल सक्षमीकरणाला चालना देणारी ही आतापर्यंतची सगळ्यात मोठी मोहीम आहे.

**//<><><><><>//**